


# दैनिक वादळ वार्ता


महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● बुधवार १७ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २४४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# आनंदवार्ता, यंदा मान्सून मनसोक्त बरसणार, हवामान विभागाचा सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज



**वादळवार्ता/ मुंबई**

मागील वर्षे मान्सूनने देशातील अनेक भागांत तूट निर्माण केली. सरासरीपेक्षाही कमी पाऊस बरसला. परंतु यंदा मान्सून मनसोक्त बसरणार आहे. संपूर्ण देशांत ऑगस्ट ते सप्टेंबर दरम्यान दमदार पाऊस होणार आहे. हवामान विभागाने यंदा मान्सून सामान्यपेक्षा जास्त असणार असल्याचे म्हटले आहे. मान्सून दीर्घ-काळाच्या सरासरीच्या (८७ सेंमी.) १०६ टक्के असेल, असा अंदाज आयएमडीकडून व्यक्त केला आहे. 'ला निना'च्या अनुकूल परिस्थितीमुळे पाऊस चांगला होणार असल्याची माहिती पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम. रविचंद्रन यांनी दिली.एम. रविचंद्रन यांनी सांगितले की, 1951 ते 2023 पर्यंतचा माहिती तपासल्यानंतर देशात नऊ वेळा मान्सून सामान्य राहिल्याचे दिसून आले आहे. ला नीनाच्या प्रभावामुळेच असे झाले आहे. 1971 ते 2020 दरम्यानच्या आकडेवारीनुसार यंदा दीर्घ-काळ सामान्य पावसाचा अंदाज आहे. जून ते सप्टेंबर दरम्यान 106 टक्के पाऊस पडणार आहे. देशात ८० टक्के भागांत सरासरीहून जास्त पाऊसभारतीय हवामानशास्त्र विभागाचे महासंचालक मृत्युंजय महोपात्रा यांनी सांगितले की, यंदा देशातील ८० टक्के भागांत सरासरीहून जास्त पाऊस पडणार आहे. देशातील ४ राज्यांत कमी पाऊस असणार आहे. अल नीनाच्या प्रभावामुळे गेल्या वर्षी कमी पाऊस झाला होतो. आता त्याचा प्रभाव ओसरला आहे. अल नीना ऐवजी आता ला नीनाचा प्रभाव प्रशांत महासागरात निर्माण झाला आहे. मागील वर्षी अल नीनामुळे 820 मिमी पाऊस झाला होता. हा पाऊस सरासरीपेक्षा कमी होता. देशात 868.6 मिमी पाऊस सरासरी इतका आहे. 2023 पूर्वी सलग चार वर्ष सामान्य पाऊस झाला होता. प्रशांत महासागराचे तापमान 30 वरून 18 अंश सेल्सिअस झाले आहे. यामुळे आता तिकडून इकडे वारे वाहत आहे. त्याचा फायदा भारतातील मान्सूनसाठी होणार आहे.

मान्सूनचा अर्थव्यवस्थेवर प्रभावभारतात मान्सूनचा प्रभाव अर्थव्यवस्थेवर आहे. देशातील जवळपास 50 टक्के शेती मान्सूनवर अवलंबून आहे. तसेच मान्सूनमुळे अनेक धरणांचा जलसाठा अवलंबून आहे. मागील वर्षी दमदार पाऊस न झाल्यामुळे त्याचा परिणाम

## माळेगाव व मोटेगाव या ग्रामीण भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**युसूफ वडगाव / सचिन भालेराव**



माळेगाव व मोटेगाव ग्रामीण भागात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते.जयंती उत्सव समितीच्या व इतर गावाकऱ्याच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाला सर्व गावकरी सहभागी झाले.

जि. प. प्रा. शाळेचे प्राचार्य भोसले सर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून केज तालुक्याचे उभरते नेतृत्व शिवसेना (उ बा ठा ) तालुका उपप्रमुख धनराज गव्हाणे, वादळवार्ता यु वडगाव सर्कल प्रमुख सचिन भालेराव, राष्ट्रवादी कार्यकर्ते नाना गायकवाड, मिलिंद भालेराव, राजाभाऊ भालेराव विनायक कदम, रुपशेन गव्हाणे, भारत भालेराव,अविनाश गव्हाणे, युवा उद्योजक गणेश चिरके, हरिश्चन्द्र गुंठाळ,मोटेगावचे उपसरपंच नितीन बचूटे,अजय बचूटे, सुशील बचूटे, सचिन बचूटे, व इतर ग्रामस्थांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली

तसेच कार्यक्रमाच्या दरम्यान आकांक्षा सचिन भालेराव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सर्व समाजापर्यंत पोहचवण्याचे मोलाचे मार्गदर्शन केले.

शेवटी नितीन बचूटे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

## होमिओपॅथिक डॉक्टर्स यांना शासकीय सेवेची संधी द्या-अशोक हिंगे पाटील

**वादळवार्ता/अकोला** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची अकोला येथील यशवंत निवासस्थानी होमिओपॅथी संघटनेला बरोबर घेऊन अशोक हिंगे यांनी भेट घेतली होमिओपॅथिक डॉक्टर ना शासकीय सेवेसाठी दिली पाहिजे या मागणीची वंचितच्या जाहीरनाम्यात समावेश करावा असे निवेदन दिले.



बी ए एम एस, व एमबीबीएस, शाखेतील डॉक्टर्सला वेगवेगळ्या शासकीय सेवेची संधी दिली जाते परंतु होमिओपॅथी डॉक्टर्सना ही संधी दिली जात नाही. स्वतःचा दवाखाना सुरू करून त्यांना आपली उपजीविका भागवावी लागते. तेव्हा या सर्व बाबींचा विचार करून होमिओपॅथी डॉक्टरांना सुद्धा शासकीय सेवेसाठी मिळावी अशी मागणी सरकारकडे होत आहे. या शिष्टमंडळाचे नेतृत्व मराठवाडा अध्यक्ष अशोक पाटील यांनी केले. त्यांच्यासोबत डॉ.पायपुळे, डॉ.बी.डी. पवार आदी सहभागी होते.असून त्याच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे .

## अखंड हरिनाम सप्ताह मुंगशी येथे ३७ रक्तदात्यांकडून रक्तदान....



**दैनिक वादळ वार्ता सोलापूर/विश्वास चोपडे**

माढा तालुक्यातील मुंगशी येथे अखंड हरिनाम सप्तानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ३७ रक्तदात्यांनी रक्तदान करून चांगला प्रतिसाद दिला. शिबिराला श्री भगवंत ब्लड बँक बार्शी यांचे सहकार्य लाभले.

श्री सद्गुरू सिताराम बाबा श्री सिताराम गड खर्डा यांच्या कृपाशीर्वादाने व श्री ह भ प महालिंग महाराज नगरे यांनी चालू केलेला श्री संत प.पु. नाना बाबा गिते दिघोळकर मठ पंढरपूर यांच्या फडाचा फिरता नारळी अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मौजे मुंगशी या ठिकाणी आयोजित केला होता. प्रारंभ चैत्रशुद्ध १ गुढीपाडवा मंगळवार दिनांक०९/०४/२०२४ रोजी झाला व सांगता चैत्र शु ८ मंगळवार दिनांक १६/०४/२०२४ रोजी सप्ताहचे विशेष म्हणजे गावामध्ये पाडव्यादिवशी सप्ताह बसला त्यादिवशी गुढी उभारण्यात आली व ती सप्ताह संपल्यानंतर उतरवण्यात आली.

ह.भ.प.महंत महालिंग महाराज पंढरपूर श्री क्षेत्र सिताराम गड खर्डा यांचे काल्याचे किर्तन झाले. नंतर आरती व समस्त गावकरी मंडळ व भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण सप्ताह अन्नदान व महाप्रसाद श्री संत गवळीबाबा व संत रघुराज महाराज अन्नछत्र मंडळ मुंगशी यांच्याकडून करण्यात आला. अशाप्रकारे कार्यक्रमाची सांगता झाली.

## श्री शिवलिंग बादशहा मठ संस्थान बेटमोगरा येथे चैत्र बारस यात्रेला सुरुवात...



**वादळवार्ता/मुखेड**

मुखेड तालुक्यातील बेटमोगरा येथे ऐतिहासिक तीर्थक्षेत्र सर्वांचे श्रध्दास्थान असलेले श्री शिवलिंग बादशाह मठ संस्थान बेटमोगरा येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी चैत्र बारस यात्रा व शिव किर्तन महोत्सव दि १७/४/२०२४ बुधवारी प्रारंभ होणार आहे. दि.२०/०४/२०२४ शनिवारी रात्री कावड मिरवणूक आहे.राष्ट्रसंत सद्गुरु १०८ ष.ब्र. डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या प्रेरणेने आणि सद्गुरु १०८ ष.ब्र.सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १७/०४/२०२४ बुधवार ते २२/०४/२०२४ सोमवार पर्यंत हा शिव कीर्तन महोत्सव आयोजित केला आहे. या उत्सवात पहाटे ५ ते ६ शिवपाठ सकाळी ७ वाजता गुरु समाधीस रुद्राभिषेक सकाळी ९ ते ११ परमरहस्य पारायण सकाळी ११ वाजता प्रवचन दुपारी ३ ते ५ गाथा भजन रात्री ८ ते १० शिवकिर्तन नंतर शिवजागर. दि.१९/०४/२०२४ रोजी सकाळी दहा वाजता जंगम दीक्षा व आय्याचार संस्कार होणार आहे. दि.२०/०४/२०२४ रोज शनिवार रात्री १० वाजता कावड मिरवणूक व दि.२१/०४/२०२४ रोज रविवार दुपारी ३ वाजता जंगी कुस्त्याचा सामना रंगणार आहे. दि.२२/०४/२०२४ रोज सोमवारी सकाळी 10 वाजता प्रसादाच्या किर्तनाने सांगता होईल व नंतर महाप्रसाद होईल तरी या उत्सवात बहुसंख्येने सहभागी व्हावे आसे आवाहन श्री शिवलिंग बादशहा मठाचे मठाधिपती सद्गुरु सिध्ददयाळ शिवाचार्य महाराज यांनी केले आहे.

## सर्वांगीण विकासासाठी शिक्षण महत्त्वाचे : प्रा.सागर कांबळे

**वादळवार्ता/कुडूत्री**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षणासाठी परिस्थिती आडवी येत होती. शिक्षण हे सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे आहे याची जाण घेऊन परिस्थितीवर विजय मिळवता येतो ही त्यांनी सिद्ध करून दाखवले. त्यामुळेच ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार झाले. असे प्रतिपादन देवचंद कॉलेजचे प्रा. सागर कांबळे (निपाणी) यांनी केले.

आवळी बुद्रुक ता. राधानगरी येथे प्राथमिक शाळेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित झालेल्या गुणवंतांचा सत्कार व व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष शहाजी पाटील होते.

प्रा. कांबळे पुढे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपल्या अफाट अज्ञानातून अस्पृश्य उद्धार आणि आधुनिक भारताची पायाभरणी केली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या ज्ञानलालसा अभ्यासूवृत्तीचा वापर आपल्या जीवनामध्ये करून आपले जीवन समृद्ध करावे असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांचे प्रत्येक विचार सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत. महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर, शाळेतील बालपणाचे प्रसंग, विदेशी शिक्षणातील प्रसंग याची सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते शाळेसमोर वृक्षारोपन केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी जयंती निमित पत्रकार पी. जी. कांबळे यांच्यावतीने घेण्यात




आलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्या सोनाली पांडूरंग कांबळे, कार्तिकी दतात्रय कवडे, मयुरी नवनाथ परीट, साईनाथ परीट या विद्यार्थीनीचा व मार्गदर्शक शिक्षक विजय पाटील यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी विजय पाटील, श्री. रेपे, पी. जी. कांबळे तसेच विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमास सरपंच सौ. अस्मिता संदीप सुतार, मुख्याध्यापक राजेंद्र सनगर, श्री. मोरे, श्री. बारड, पत्रकार शिवाजी पाटील, अनिश पोवार, साताप्पा चौगले यांच्यासह विदयार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार संजय पाटील यांनी मानले.

संपादकीय

# रामनवमी

राजकीय पुढाऱ्यांनी प्रभु रामचंद्राचे आदर्श सामोर ठेऊन निस्वार्थ देशसेवा करावी.

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू धर्माच्या नवीन वर्षाची सुरुवात, या दिवशी गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते. महाराष्ट्रात नवीन वर्ष “गुढीपाडवा” म्हणून साजरा केला जातो तर इतर राज्यांत वेगवेगळ्या पध्दतीने हा सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केल्या जातो.याच महीण्यात चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्म झाला. त्याचप्रमाणे याच महीण्यात सात दिवसांनी महाबली हनुमान यांचा जन्म झाला.म्हणजे चैत्र महिन्यात मर्यादापुरुषोत्तम रामांचा जन्म व महाबली हनुमान यांचा जन्म म्हणजे एक दैवी लीलाच म्हणावी लागेल. यामुळे संपूर्ण भारतात दरवर्षी रामनवमी व हनुमान जयंती मोठ्या उत्साहाने व थाटाने साजरी करण्यात येते. रामनवमीला भजन, कीर्तन व मोठ-मोठ्या झांक्या काढून संपूर्ण भारतात श्री रामांचा जयघोष दिसून येतो व या दिवशी संपूर्ण माध्यमातून श्रीरामाचे नामस्मरण केल्या जाते.आज जगात ज्या-ज्या ठीकाणी सत्यता व संयमता दिसून येते यामागे मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचीच लिला आहे. भारतात बहुसंख्य हिंदू असतांना सुध्दा सर्व धर्मांना घेऊन चालण्याचा मान फक्त भारतीय संस्कृतीमध्येच आहे. कारण संस्कृती,सन्मान,सभ्यता,संयमता, दृढनिश्चयता, आपुलकीची भावना आणि सर्वांना एकत्र घेऊन चालण्याची क्षमता फक्त भारतीय संस्कृतीमध्येच दिसून येते.कारण भारतात सर्वच धर्मांचे लोक एकोप्याने आणि आनंदाने रहातात.त्यामुळे संपूर्ण हिंदु धर्म राममंदिर बांधकामाच्या प्रतीक्षेत होता आणि ते साध्य झाले.त्यामुळे आज आपल्याला अयोध्येत भव्य राममंदिर दिसून येते.आज भारतात हिंदू धर्मामध्ये संयमता दिसून येते ती फक्त प्रभूराचंद्राच्या आशीर्वादानेच. यामुळे विदेशी नागरिकांची जगातील पहीली पसंती भारत असल्याचे दिसून येते.यामागे फक्त प्रभू राचंद्रांचेच आदर्श म्हणावे लागेल व आहे. प्रभूराचंद्राचा आशिर्वाद भारतीयांना आहे.त्यामुळे या धर्तीवर प्रभूश्रीराम सर्वांचेच आहे आणि राहील.कारण अयोध्येत राम जन्मले हे वास्तव्य आहे याची पुष्टी भारतीय पुरातत्त्व विभाग व विदेशातील अनेक पुरातत्त्व विभागाने जाहीर केले आहे.श्री रामाचा जप आपण जन्मा पासून तर शेवटपर्यंत करीत असतो. त्याचप्रमाणे कठीण प्रसंगी रामाचे नामस्मरण करून येणाऱ्या अडचणी व दु:ख दूर करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यामुळे प्रभूराम सर्वांच्या मनात, हृदयात, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिन,निसर्ग,वन्यप्राणी,मानव-जिवजंतु यांच्या मना-मनात वावरत असतो.त्यामुळेच जगातील इतर देशांच्या तुलनेत प्रत्येक विदेशी नागरिकाची पहीली पसंत भारत असल्याचे दिसून येते.कारण भारतात सर्वच धर्मांच्या देवी-देवतांचा, साधुसंतांचा व थोरमहात्म्याचा वास आहे. त्यामुळे भारतवासी एकोप्याने राहतात.आज जगात भारत विश्र्व शांतीचे प्रतीक आहे हे फक्त प्रभू राचंद्रांच्या आदर्शामुळे. त्यामुळे प्रभूराचंद्राचे महत्त्व आणि त्यांची लीला हिंदू धर्माला ग्यात आहेच. अयोध्येतील राममंदिर भारतीयांच्या मदतीने एवढे भव्य झाले आहे की त्याची संपूर्ण जगात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यटनाला चालना देणारे ठीकाण बनलेले आहे.त्याचप्रमाणे सात अजुब्यातुन राममंदिर प्रथम क्रमांकावर असल्याचे मी समजतो.त्यामुळे राममंदिर ते राष्ट्रमंदिर ही भुमिका सर्वांनीच अंगीकारली पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदूसंस्कृती जोपासण्याकरीता देशातील प्रत्येक हिंदूनी नवनिर्माण अयोध्येतील राम मंदिरात जाऊन रामाचे चरन स्पर्श केलेच पाहिजे.भारतातील प्रत्येक धर्माच्या लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की श्रीराम सर्वांचे आहे व राहील. श्रीरामाने १४ वर्षे वनवास भोगला,वालीसारख्या अहंकारी शक्तीचा सर्वनाश केला,रूषि-मुनी,साधु-संत, गोरगरीब यांचे संरक्षण केले,रावनासारख्या असुर शक्तीचा नाश केला तेव्हाच रामराज्याची स्थापणा झाली व सत्ययुग प्रस्तापीत झाले आणि तेव्हापासूनच सर्वांच्या मनात प्रभूराचंद्राची धुंद गुंजतांना दिसते.तीच प्रतीकृती आज अयोध्येमध्ये साकार झाली आहे हे हिंदू धर्माचे अहोभाग्यच म्हणावे लागेल.आज अयोध्येतील राम मंदिरमुळे “मन में राम,तन मे राम,घर-घर मे राम” या आवाजाची गुंज आपल्याला संपूर्ण भारतात ऐकायला व पहायला मिळत आहे.आजही जगात अनेक देशांमध्ये हिंदू संस्कृतीची जोपासना केली जाते व हिंदू संस्कृतीचा इतिहास सुध्दा दिसून येतो.यामागचे मुख्य कारण म्हणजे श्रीरामांचे आदर्श आहे. श्रीरामांचा इतिहास आणि वास्तव भारतासह जगातील अनेक देशांमध्ये पहायला मिळते. तेव्हाच प्रभुश्रीरामचंद्रांना मर्यादापुरुषोत्तम म्हटल्या जाते. प्रभु राम सत्यतेचे प्रतीक आहे.त्याचे अनुकरण देशातील लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी स्वयंघोषित समाजसेवक यांनी करून जनसेवा करण्याची नितांत गरज आहे.कारण देशातील ९५ टक्के राजकीय पुढारी अहंकारी वृत्तीचे असल्यामुळे भ्रष्टाचाराने लिप्त आहेत.या कलयुगात राजकीय पुढारी समाजसेवेपेक्षा स्वत:ची सेवा करण्यात मग्न(गुंग)असतात.”मु मे राम बगल में छुरी” अशा प्रकारची असुरी भावना त्यांच्यात दिसून येते. कारण गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पीवुन आजचा ९५ टक्के राजकीय पुढारी “रक्तबीज” राक्षसाची भुमिका बजावीतांना दिसून येते.त्यामुळेच देशात भ्रष्टाचार उफाळलेला आहे. आज देशातील प्रत्येक राजकीय पुढारी करोडपती झालेला आहे. यामुळेच आज देशात महागाई, बेरोजगारी, भुकमरी,महागडे शिक्षण,शेतकऱ्यांच्या समस्या व आत्महत्यां यांनी जन्म घेतला आहे.मी रामनवमीच्या निमित्ताने देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी यांना विनंती करतो की रामराज्याची संकल्पना साकार करायची असेल तर आपण वाममार्गाने कमवीलेली व भ्रष्टाचार रूपाने कमविलेल्या संपूर्ण संपत्तीचा त्याग करून सरकारच्या तिजोरीत जमा करावा किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावा यातच खरे प्रभु श्रीराम यांचे दर्शन दिसून येईल.त्याचप्रमाणे भुकेलेल्यांना अन्न हा देवी-देवतांचा मुलमंत्र आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी अंगीकारला पाहिजे.राजकीय पुढाऱ्यांनी गरिब व सर्वसामान्यांची लुटमार थांबवून आणि महागाई कमी करून समाजकार्य करावे यातच खरा प्रभु रामचंद्राचा आदर्श दिसून येईल व पुन्हा आपल्याला भारतात रामराज्य साकार करता येईल.जोपर्यंत देश भ्रष्टाचारमुक्त होत नाही तोपर्यंत भारतात रामराज्य शक्य नाही.याकरीता भ्रष्टाचारावर आळा व अहंकारी राजकीय पुढाऱ्यांच्या चल-अचल संपत्तीची कठोर चौकशी करून यांची संपत्ती जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे. यातच आपल्याला रामराज्य खऱ्या अर्थाने दिसून येईल. आजचा राजकीय पुढारी स्वार्थी झाल्यामुळे व यांच्यात असुरी शक्ती निर्माण झाल्याने देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत.त्यामुळे देशाच्या १४० कोटी जनतेला आज महागाईचा श्राप बसल्याचे दिसून येते.या असुरी शक्तीला संपवायचे असेल तर प्रभु रामचंद्राचे आदर्श सामोरं ठेऊन राजकीय पुढाऱ्यांनी समाजकार्य करायला हवे.तेव्हाच भारतात रामराज्य प्रस्थापित होईल.रामनवमीच्या पावन दिवसांचे औचित्य साधून संपूर्ण रामभक्तांनी, सामाजिक संघटनांनी, प्रशासनाने व सरकारने आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून वाढत्या प्रदुषणावर व बदलत्या हवामानावर आवळा घालण्यासाठी वृक्षारोपण करून एक आगळावेगळा उपक्रम राबविला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईल व आपल्याला प्रत्येक पानात, फुलात,फळात प्रभु श्रीरामचंद्रांचे दर्शन अवश्य होईल.कारण निसर्गाच्या सान्निध्यातच प्रभु रामचंद्र आहेत. जय श्रीराम!

**लेखक रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी,नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजेत-जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर

वादळवार्ता/बीड

दि.१४एप्रिल २०२४ रोजी बीड वकील संघातर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती उत्साहपुर्ण वातावरणात सकाळी ७.३० वाजता संपन्न झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष आनंद यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी अध्यक्षीय भाषण करतांना म्हणाले की, भारतीय राज्य घटनेमुळे अस्तिवात आलेल्या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे सामाजिक विषमता कमी-कमी होत गेली आणि ती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे परंतू समाजातील आर्थिक विषमतेची दरी वाढत चालली आहे. गरीब -गरीबच होत चाललेला आहे आणि श्रीमंत-श्रीमंतच होत चाललेला आहे, नवीन भांडवलदाराचा वर्ग तयार होवू लागला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संदेशाप्रमाणे समाजाने शिकले पाहिजे, संघटित झाले पाहिजे आणि आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजे तसेच पुढे त्यांनी सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे कुशल युद्धशास्त्रनितीकार होते ते उत्कृष्ट जलनिती तज्ञ होते त्यांच्या जलनितीमुळेच भाक्रानांगल सारखे जल प्रकल्प अस्तित्वात आले ते आदर्श विद्यार्थी, १८ तास अभ्यास करत असत, आदर्श राजकारणी, आदर्श नेता, आदर्श पत्रकार, आदर्श वकील, आदर्श प्राध्यापक आणि देशाचे पहिले कायद्या मंत्री होते अशा विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकला आहे असे प्रतिपादन जिल्हा व सत्र न्यायाधिश आनंद यावलकर यांनी अध्यक्षीय समारोपाप्रसंगी केले.यावेळेस कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश साहेब मुकूंद उदावंत, दिवाणी




न्यायाधिश वरिष्ठ स्तर एस.एस.पिंगळे मॅडम, विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी.जी.सोनी आणि धर्मादाय आयुक्त पाटील मॅडम, बाल न्यायमंडळाचे अध्यक्ष अशोक तांगडे, बीड वकीलसंघाचे अध्यक्ष ॲड.प्रशांत राजापूरकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग एस.टी. सहारे यांनी म्हटले की, भारतीय संविधान जगातील सर्वात उत्कृष्ट संविधान आहे या संविधानाची अंमलबजावणी करणारे लोक प्रामाणिक असतील तर संविधानाचा सदउपयोग सर्व नागरिकांच्या समतोल विकासासाठी होईल आणि या संविधानाची अंमलबजावणी करणारे अप्रामाणिक आणि बेईमान व्यक्ती असतील तर संविधानाचा दुरुपयोग होईल वरील मुद्दा त्यांनी पावसाच्या पाण्याचे उदाहरण देवून सोप्या भाषेत संविधानाचे महत्व समजावून सांगितले पावसाचा एक हाताच्या ओंजळीत पडले तर पिण्यासाठी सर्वात शुद्ध पाणी असेल. पावसाचे पाणी सागरात पडले तर त्याचा सुंदर मोती होईल आणि हेच पावसाचे पाणी गटारात पडले तर त्याची दुर्गंधी येईल. या कार्यक्रमास ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. मधुसुदन बाहेगव्हाणकर, ॲड. कृष्णा पंडित, ॲड.वसंत वडमारे, ॲड.नामदेव साबळे, ॲड.भिमराव चव्हाण, ॲड.मंगेश पोकळे, ॲड. किशोर टेकवाणी, ॲड.रोहीदास येवले, ॲड.विलास जोशी, ॲड. शिवाजी कांबळे, ॲड.तेजस नेहरकर, ॲड.प्रशांत दगडखैर, ॲड.अविनाश गडगे, ॲड. सुनिल साळवे, ॲड. विजय जावळे, ॲड. धिरज कांबळे, ॲड.राजन साळवी, ॲड. नासेर पटेल, ॲड.लहू जगताप, ॲड.अशोक शेटे, ॲड.लक्ष्मीनारायण काकडे, ॲड. सतिश सोनवणे, ॲड.लहू गंगावणे, ॲड.चंद्रवदन जाधव, ॲड.रईस पठाण, ॲड.शिवाजी साळवे, ॲड. सुशिल सरपते, ॲड.सखाराम साळवे सामाजिक कार्यकर्ते तत्वशिल कांबळे, अरुण भोले, किशोर कागदे, राजू वीर, रावसाहेब मोटे, ॲड.असिमा पटेल, ॲड.संगीता कोकाटे, ॲड. विद्या गायकवाड, ॲड.छाया वाघमारे, ॲड.ज्योती साळवे, ॲड.मंगल शिंदे, ॲड.वंदना साळवे, ॲड.संगीता वीर, ॲड.अनिता चक्रे, ॲड.नईम कुरेशी, ॲड.सिद्धेश्वर शिंदे, ॲड.दिलीप वारे, ॲड.यासेर पटेल, ॲड.वंदना पारवे, ॲड.रेखा वडमारे, ॲड.प्रकाश गलांडे, ॲड. दिपक ससाणे, ॲड. फिडेल चव्हाण, ॲड.पंकज रायभोळे इत्यादी वकील बांधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड. दादासाहेब तांगडे, ॲड.एकनाथ काकडे, ॲड. विठ्ठल शेळके, ॲड. आनंद कुलकर्णी, ॲड.शेख इमरान खाजा, ॲड.सायली सुतार यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ॲड.नितीन वाघमारे यांनी केले.-

# परळी रेल्वे स्थानकावर लिफ्टमध्ये अडकले प्रवासी

वादळवार्ता/परवेज पटेल

परळी वैजनाथ रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक तीनवर रेल्वे प्रवाशांसाठी असलेल्या लिफ्टमध्ये अचानक काहीतरी बिघाड झाल्याने ही लिफ्ट मध्येच अडकली. या लिफ्टमध्ये काही प्रवासी अडकून बसले. चालू लिफ्ट अचानकच बंद पडून अडकल्याने या लिफ्ट मधील प्रवाशांची तारांबळ उडाली. परळी रेल्वे स्थानकावर आज रात्री प्लॅटफॉर्म क्रमांक तीन वर अकोला गाडी ला जाण्यासाठी काही प्रवासी लिफ्ट मधून वर जात असताना या लिफ्टला तांत्रिक बिघाड झाला. लिफ्ट सुरू झाल्यानंतर मध्येच अडकून बसली. त्यामुळे बराच वेळ या लिफ्टमध्ये प्रवाशी अडकले. लिफ्टमध्ये असलेल्या प्रवाशांची मात्र चांगलीच तारांबळ उडाल्याचे चित्र बघायला




मिळाले. लिफ्टमध्ये अडकलेल्या प्रवाशांची तारांबळ प्लॅटफॉर्म वरील नागरिकांच्या लक्षात आली आणि नागरिकांनी सतर्कता दाखवत ही लिफ्ट खाली घेतली व लिफ्टमध्ये अडकलेले प्रवासी त्यानंतर सुखरूप बाहेर पडले. दरम्यान अनेक वेळा परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाच्या प्रशासनाचा गलथान कारभार नेहमीच समोर येतो. यातच आता रेल्वे स्थानकातील लिफ्ट मध्ये प्रवासी अडकल्याची घटना समोर आली. त्यामुळे रेल्वे स्थानकावरील तांत्रिक विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वास्तविक पाहता रेल्वे स्थानकातील ज्या लिफ्ट आहेत त्या लिफ्ट वर देखरेख करण्यासाठी तांत्रिक विभागाचे कर्मचारी नियुक्त केलेले असतात. मात्र आज जेव्हा ही लिफ्ट अडकण्याची घटना घडली तेव्हा नागरिकांना नागरिकांनीच मदत केली. त्यावेळी या तांत्रिक विभागाचे कर्मचारी कुठे होते? असा प्रश्न निर्माण होतो. रेल्वेची ही लिफ्ट अनेक वेळा नादुरुस्त असते. त्यामुळे या लिफ्टमध्ये असे प्रकार पाहावयास मिळतात. यापूर्वी सुद्धा अनेक प्रवाशांची अशाच प्रकारे तारांबळ उडालेली आहे.

# देशी गावठी कट्ट्यासह दोन जिवंत काडतुस जप्त !

वादळवार्ता/परवेज पटेल

परळीतून एका जणाकडून देशी गावठी कट्टयासह दोन जिवंत काडतुस जप्त करण्यात पोलीसांना यश मिळाले आहे. संभाजीनगर परळी वै. पोलीसांनी आज ही कार्यवाही केली आहे संभाजीनगर पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, सुरजसिंग प्रेमसिंग जुन्नी रा फुलेनगर परळी हा उड्डुणपुला खाली थांबला असुन त्यांचे जवळ गावठी कट्टा आहे. पोलीस स्टाफ व दोन पंचासह रवाना होवुन सुरजसिंग प्रेमसिंग जुन्नी रा फुलेनगर परळी हा उड्डाणपुला खाली शिदी खाण्याचे समोर मिळून आला पंचा समक्ष त्याची अंग झडती घेतली असता त्याचे कंबरेला उजव्या बाजुस




पॅन्टमध्ये खोवलेला एक सिल्वर रंगाचा स्टेनलेस स्टीलचा गवठी बनावटीचा मॅगझीनसह कटटा (पिस्टल), ज्यास पकडण्यासाठी स्टीलची मुठ व त्यावर ग्रीप करीता चॉकलेटी रंगाचे प्लास्टीक कव्हर असलेला असा जुना वापरता कि.अ.४००००/- रुपये व मॅगझीन मध्ये दोन जिवंत काढतुस १०००/- रुपये असे गावठी कटटा व काढतुस दोन्हीची एकुण किमंत ४२०००/- रुपयेचा मुदेमालासह मिळुण आल्याने दोन पंचासह जप्ती पंचनामा करुन मुदेमाल व आरोपी ताब्यात घेवुन त्या वरुन. संभाजीनगर गु.र.न ५५/२०२४ कलम कलम ३/२५, भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि ए.टी. शिंदे करीत आहेत.पो.नि उस्मान शेख, यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि शिंदे, पोह/भांगे, पोना/सानप, पोना/ मस्के, पोना/ शिंदे, पोकों/ फड, पोकों गुट्टे यांनी ही कारवाई केली

# नरसिंग लिंबाची दातार यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन

वादळवार्ता/केज

केज तालुक्यातील बेलगाव येथील नरसिंग लिंबाची दातार यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाल्याची घटना दिनांक १५ एप्रिल सोमवार रोजी सांय ६.०० वाजण्याच्या सुमारास वाघोली येथे घडली आहे.तरी या बाबतची अधिक



माहिती अशी की बेलगाव येथील रहिवासी नरसिंग दातार यांचे मृत्यू समयी वय ६५ वर्षे होते.नरसिंग आप्पा हे कुठल्याही आजाराने त्रस्त नव्हते. हे अत्यंत गरिब व मनमिळावू स्वभावाचे होते.त्याच्या पश्चात तीन मुले, तीन सुना, नातवंडे असा दातार परिवार आहे.त्याच्या जाण्याने बेलगाव परिसरात शोककळा पसरली आहे. त्याच्या पार्थिवावर दिनांक १६ एप्रिल मंगळवार रोजी सकाळी १० वाजता बेलगाव येथील त्यांच्या शेतामध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले .यावेळी पंचक्रोशीतील मित्रपरिवार , नातेवाईक, गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षण हे संस्कार व समाज निर्मितीचे साधन आहे साध्य नाही-माजी प्राचार्य रा.गो.धाट

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

"शिक्षण हे समाज संघटित करण्याचे साधन असून तत्कालीन काळात वंचित समाज घटक आणि महिला यांच्या उत्थानासाठी खूप मोठे कार्य भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. आपण केवळ शिक्षण घेवून उपयोगाचे नाही. तर शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाची अंमलबजावणी कशी करायची हे आपणास समजले पाहिजे, त्यासाठी समाजात समता, स्वातंत्र्य व बंधुता निर्माण करण्याची आवश्यकता आहे, म्हणून शिक्षण हा संस्कार आहे आणि शिक्षण हे समाज निर्मितीचे साधन आहे, साध्य नाही," असे प्रतिपादन खोलेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य राजाभाऊ धाट यांनी केले. ते खोलेश्वर महाविद्यालयात सांस्कृतिक आणि संगीत विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भा.शि.प्र. संस्थेच्या केंद्रीय कार्यकारणीचे सदस्य तथा महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी हे उपस्थित होते. तर व्यासपीठावर महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य डॉ.प्रवीण जोशी, सदस्य सौ.संगिताताई धर्मराव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रारंभी सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. पुढे बोलताना माजी प्राचार्य धाट यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याचा परिचय करून देताना डॉ.आंबेडकरांचे शैक्षणिक चिंतन आणि कार्य याविषयी सविस्तर माहिती दिली तसेच त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ अनुसार प्रत्येकाला शिक्षणाचा मुलभूत अधिकार देवून डॉ.आंबेडकर यांनी सर्वांना शिका, संघटित व्हा, संघर्ष करा असा संदेश दिला असे सांगितले. डॉ.आंबेडकर यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ.आंबेडकरांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या विचारधनातून आपण काही तरी घेऊ व त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालू अशी अपेक्षा त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना राम कुलकर्णी म्हणाले की, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सारख्या महान व्यक्तींच्या कार्याला स्मरून आपण जर जीवन जगलो तर समाजोन्नती नक्की होईल अशा भावना याप्रसंगी कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ.तात्या पुरी यांनी केले. ते म्हणाले की, अभ्यास मंडळाच्या वतीने वर्षभर विद्यार्थ्यांचे व अध्यापकांचे उद्बोधन होईल अशा प्रकारचे विविध कार्यक्रम, उपक्रम आयोजित केले जातात. त्याचाच एक भाग म्हणून आजचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. कालिदास चिटणीस यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा.शैलेश पुराणिक यांनी मानले. दरम्यान सकाळी खोलेश्वर महाविद्यालयाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित भीमगीतांच्या गायनाचा अतिशय सुरेख व प्रबोधनपर असा कार्यक्रम सादर करून महामानवांना अभिवादन केले. यावेळी कु.क्रांती एडके, कु.प्रतिक्षा भुतकर, सौ.मनिषा वैरागे, शाहीर गणेश मामा काळे, बळीराम उपाडे, प्रा.महादेव माने आदींनी गायन केले. तर सिंथेसायझरवर विकास एडके, पांडुरंग कुलकर्णी व सिद्धार्थ आवशंख यांनी साथ-संगत केली. शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विविध उपक्रमांनी पार पडली जरेवाडी शाळेची शिक्षणजत्रा.

**वादळवार्ता/पिंपळवंडी**

विविध उपक्रम प्रभावी आणि उत्कृष्टरित्या राबविनाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जरेवाडी, केंद्र- पिंपळवंडी, तालुका- पाटोदा येथे १६ एप्रिल २०२४ रोजी शिक्षणजत्रा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये एकूण ३६ स्टॉलची उभारणी करण्यात आलेली होती. मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान, खगोलशास्त्र क्लब, ऍस्ट्रॉनॉमी क्लब, विविध प्रकारचे मनोरंजक खेळ, पथनाट्य, महाराष्ट्राची लोकधारा सांस्कृतिक नृत्य, कराओके संगीत, पारंपरिक संस्कृतीचे स्टॉल, आरोग्य, वाहतूक, पर्यावरण माहिती त्याबाबतचे नियम सांगणारे स्टॉल शालेय विद्यार्थ्यांनी लावले होते. लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने यावेळी मतदान जनजागृती स्टॉल देखील उभारण्यात



आला आणि मतदान जनजागृती पथनाट्य शालेय विद्यार्थ्यांनी याप्रसंगी सादर केले. विद्यार्थ्यांनी स्वतः खाद्यपदार्थ बनवून विक्री देखील केली. यामध्ये मटकी भेळ, वडापाव, विविध फ्लेवरचे थंडगार सरबत, मसाला शेंगादाणे, ब्रेड पॅटीस, गुलाब जामून इत्यादी खाद्यपदार्थांचे स्टॉल सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी व्यवस्थितपणे मांडणी करून उभारले आणि विद्यार्थी व पालकांना विक्री देखील केली. खाद्यपदार्थांच्या विक्रीमधून विद्यार्थ्यांनी तीन तासांमध्ये ५५ हजार ४०० रुपये जमवले. या विविधरंगी नाविन्यपूर्ण उपक्रमांनी सजलेल्या शिक्षणजत्रेसाठी इयत्ता सहावी ते आठवी मधील एकूण जवळपास १५६ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. या शिक्षणजत्रेला पालकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. विशेषत: माता पालकांची उपस्थिती लक्षणीय होती. सर्व मुलांच्या चेहऱ्यावर मनस्वी आनंद दिसून येत होता.

या शिक्षणजत्रा उपक्रमाचे उद्घाटन स्वामी विवेकानंद विद्यामंदिर बीड चे मुख्याध्यापक श्री.जगताप सर, पिंपळवंडी केंद्राचे केंद्रप्रमुख तथा मुख्याध्यापक गोविंद कदम सर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी जरेवाडी शाळेतील सर्व शिक्षक वृंद तसेच जरेवाडी ग्रामस्थ यांनी विशेष सहकार्य करून टीमवर्कचे दर्शन घडविले. या कार्यक्रमासाठी पत्रकार बबनराव उकांडे, चंद्रकांत पवार, भाऊसाहेब पवार, अनिल गायकवाड, तसेच पिंपळवंडी केंद्रातील शिक्षक वृंद, तसेच या कार्यक्रमाची जाहिरात पाहून स्वामी विवेकानंद विद्यामंदिर बीड येथून जवळपास २४ शिक्षक कार्यक्रमास उपस्थित होते. तसेच परिसरातील सर्व शिक्षणप्रेमी नागरिक, आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. एखाद्या मोठ्या जत्रेचे स्वरूप जरेवाडीला गावाला आले होते.

## रामनवमी निमित्ताने जरंडीला अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह

**वादळवार्ता/सोयगाव**

बालाजी संस्थान च्या वतीने श्रीराम नवमी निमित्ताने बुधवार ता.१७ ते मंगळवार ता.२३ एप्रिल पर्यंत जरंडी ला अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह व संगीतमय श्रीराम ज्ञानकथा आयोजित करण्यात आली आहे यामध्ये पहाटे पाच ते सहा वाजेपर्यंत काकडा,सात ते आठ विष्णू सहस्त्र नाम सकाळी नऊ ते ११ व दोन ते पाच वाजेपर्यंत श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे ह भ प सुधानवा महाराज केनेकर यांच्या वाणीतून श्रीराम कथा होत असून बुधवार (ता.१७) सकाळी दहा ते बारा ह भ प निलेश महाराज राजपूत भगवान गड यांचे तर रात्री ह भ प ज्ञानेश्वर महाराज माऊली शेलुदकर यांच्या किर्तनाने या सोहळ्याला सुरुवात होणार आहे गुरुवारी (ता.१८) हिंदुभुवन किरण महाराज शिंदे मेहकर, शुक्रवार (ता.१९)विजय महाराज खवले शनिवारी (ता.२०) ह भ प राहुल महाराज पाटील आळंदी देवाची, रविवारी( ता.२१) बापू दातार महाराज, सोमवारी विशाल महाराज देशमुख तर मंगळवारी (ता.२३) विठ्ठल महाराज राठोड यांचे हनुमान जयंतीनिमित्त काल्याचे कीर्तन होणार आहे या व्यतिरिक्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे बालाजी संस्थान जरंडी, ग्रामस्थ जरंडी व बालाजी भजनी मंडळ जरंडी हे अखंड हरिनाम सप्ताह साठी पुढाकार घेत आहे या सप्ताह व कीर्तन सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन बालाजी संस्थान जरंडी यांनी केले आहे

# श्रीक्षेत्र गहीनाथ गडाचा ९२ वा नारळी सप्ताह तांदळवाडी भिल्ल २३ पासून प्रारंभ

**वादळवार्ता /गहिनीनाथ गड**

प्रातःस्मरणीय श्री संत वामनभाऊ महाराज यांनी प्रारंभीलेला श्रीक्षेत्र गहीनाथ गडाचा ९२ व नारळी सप्ताह यावर्षी बीड जिल्ह्यातील तांदळवाडी भिल्ल या ठिकाणी संपूर्ण होत असून यानंतर सप्ताहाचा सर्व भाविक भत्ता आणि लाभ घ्यावा असे आवाहन गुरुवर्य महंत ह भ प विठ्ठल महाराज श्रीक्षेत्र गहीनाथ गड व ग्रामस्थ तांदळवाडी यांनी केले आहे


हा नाम सप्ताह महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण होत असून तांदळवाडी भिल्लाचे ग्रामस्थ यासाठी मोठे नियोजन करीत करीत आहेत या सप्ताहासाठी लागणारी सर्व जाहीर तयारी चालू असून येत्या २३ एप्रिल पासून हा फिरता नारळी सप्ताहाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आव्हान देखील करण्यात आले आहे

यानिमित्त दैनंदिन कार्यक्रम याप्रमाणे पहाटे विष्णुसहस्त्रनाम गाथा भजन दुपारी दोन ते पाच श्रीमद् भागवत कथा हरिपाठ व रात्री आठ ते दहा हरी किर्तन व त्यानंतर जागर होईल

यावर्षी श्रीमद्भागवत कथेसाठी ह भ प विद्या विभूषित महामंडलेश्वर श्री श्री १००८ श्री उत्तम जी महाराज यांच्या रसाळ वाणीतून दोन ते पाच वाजता ही कथा श्रवण करण्याचा योग आपणास मिळालेला आहे

या सप्ताहातील कीर्तन याप्रमाणे ह भ प केशव महाराज नामदास पंढरपूर ह भ प लक्ष्मण महाराज फड खडकवाडी ह भ प मधुकर महाराज सायाळकर टीव्ही फेम परभणी ह भ प विदर्भ रत्न रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर अकोला ह भ प आसाराम महाराज बडे आळंदी देवाची ह भ प प्रभाकर दादा महाराज बोधले पंढरपूर ह भ प महामंडलेश्वर अमृत महाराज जोशी बीड यांचे कीर्तन होणार आहे

दिनांक ३० एप्रिल रोजी या सप्ताहाची सांगता होणार असून या निमित्त सकाळी ११ ते एक श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत गुरुवर्य ह भ प विठ्ठल महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार आहे कीर्तनानंतर महाप्रसाद होऊन या सप्ताहाची सांगता होणार तरी सर्व बीड जिल्हा व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या नाम सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थ तांदळवाडी भिल्ल यांच्या वतीने करण्यात आले आहेदेशाचे संविधान कोणीच समाप्त करु शकत नाही. विरोधकांकडे मुद्दे नाहीत, यामुळे भाजप संविधान बदलणार? असे आरोप ते करत आहेत. संविधानाची हत्या काँग्रेसनेच केली आहे. आणीबाणी लागू करुन संविधान संपवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. उलट पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी आल्यावर त्यांनी सर्वात प्रथम संविधानाची पूजा केली, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले..




# बालाजी नगर मधे गुरुवारी गाईनी दिला दोन वासराना जन्म !

**गाय कोणाची असेल त्यांनी घेऊन जाण्याचे केले आवाहन !**
**कोवळ्या वासरांना मोकाट कुत्र्यांचा धोका संभवतो**



**वादळवार्ता/शिरूर कासार**

शिरूर कासार शहरातील बालाजी नगर भागात एका गाईने भरदुपारी दोन वासरांना जन्म दिला मात्र ही गाय कुणाची आहे हे समजून आले नाही ज्याची असेल त्यांनी गाय वासरू ताब्यात घ्यावीत अन्यथा कोवळ्या वासरांना मोकाट कुत्र्यांचा धोका संभवतो असे आवाहन गोसेवक आकाश गायके यांनी केले आहे . उन्हाचा चढता पारा आणि प्रसुती वेदना अशा दुहेरी वेदना सहन करत गाईने एक नव्हे दोन गोंडस वासरांना जन्म दिला मात्र आपल्या पिलांना कुत्र्याचा त्रास होऊ नये म्हणून गाईनेच सरंक्षण देत उन अंगावर घेतले . हे दृष्या आकाश गायके यांनी पाहिल्यानंतर त्यांनी गाईला पाणी पाजले ,थोडेसे खाद्य खाऊ घातले संध्याकाळ पर्यंत त्यांनी गाईची निगरानी देखील केली ,वासरांना सावलीत घेतले व आपल्या कामावर गेले ,मात्र गाय या बांळातपणातून सावरल्यानंतर वासरा सह तिथून गेली , ही गाय ज्याची असेल त्यांनी घेऊन जावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

## रामपुरीत बजरंग सोनवणेंनी घेतली जळीतग्रस्त कुटुंबाची भेट

वादळवार्ता/गेवराई

गेवराई तालुक्यातील रामपुरी येथील सरपंच अंकुशराव मस्के यांचे घर आणि घरात ठेवलेला कापूस आगीत जळून गेल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे व राष्ट्रवादी किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पूजा मोरे यांनी सरपंच अंकुशराव मस्के यांच्या जळीतग्रस्त घराची व नुकसानीची



पाहणी करीत मस्के कुटुंबियांचे सांत्वन केले. या नुकसानीचा पंचनामा करून प्रशासनाने त्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी बजरंग सोनवणे यांनी केली. यावेळी गावातील प्रमुख नागरिक जगदीश मस्के, अण्णासाहेब मस्के, सुभाष पवार, सचिन शरणागत, अशोक राऊत, हुसेन शेख, अनिल मस्के, नितीन पवार हे उपस्थित होते.

सफेपुर येथील कु. शिल्पा रघुनाथ घोडके हिची (MPSC2021) च्या अंतर्गत PSI पदावरती निवड झाली. तिचे परिस्थितीशी चार हात करणे हा आदर्श प्रत्येक मुलींसाठी व गरीब कुटुंबासाठी नक्कीच फायदेशीर ठरेल. शिल्पाचा यथोचित सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी नारायण बप्पा शिंदे जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड तथा मा. जि.प.सदस्य, बीड



# नामनिर्देशन पत्र अर्ज सजगतेसह नियमानुसार परिपूर्ण भरा : जिल्हादंडाधिकारी

**वादळवार्ता/बीड**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुका सुरू असून ३९ बीड लोकसभा मतदारसंघात चौथ्या टप्प्यात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान होणार असून यासाठी उमेदवाराकडून नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया गुरुवार दिनांक १८ एप्रिल पासून सुरुवात होणार आहे हे नामनिर्देशन अर्ज उमेदवाराने सजगतेने तसेच परिपूर्ण भरावे अशा सूचना, जिल्हादंडाधिकारी आणि दीपा मुधोळ मुंडे यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत केले. आज नियोजन सभागृहात सर्व राजकीय पक्षांची बैठक बोलविण्यात आली असून या बैठकीदरम्यान जिल्हादंडाधिकारी यांनी सूचना केल्या. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे उपस्थित होते. जिल्हा निर्णय निवडणूक अधिकारी पुढे म्हणाल्या, १८ एप्रिल रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध होणार आहे. याच दिवसापासून ११ ते ३ पर्यंत दिनांक २५ एप्रिल पर्यंत जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात हे नामनिर्देशन पत्र स्वीकारले जातील. अनुसूचित जाती तथा जमातीच्या उमेदवारासाठी १२५०० हजार रुपये अनामत रक्कम आहे तर सामान्य वर्गातील सदस्यांसाठी २५००० रुपये अनामत रक्कम आहे. अनामत रक्कम जमा करून नामनिर्देशन पत्र दाखल केल्यानंतर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यापुढे शपथ घेणे आवश्यक असल्याचे माहिती त्यांनी यावेळी दिली. नामनिर्देशन पत्रासोबत शपथ पत्र नमुना २६ हा देखील सादर करणे आहे याची वेळ २५ एप्रिल रोजी तीन वाजेपर्यंत असणार आहे. शपथ पत्र अपूर्ण असल्यास दुसरे शपथ पत्र सादर करण्याची दिनांक २६ एप्रिल सकाळी ११ वाजे पासून असणार आहे. याच दिवशी मतदार यादीची प्रमाणित पत्र दाखल करावी लागणार आहे. फॉर्म ए व फॉर्म बी २५ एप्रिल दुपारी तीन वाजेपर्यंत सादर करणे आहे. नामनिर्देशन पत्राची छाननी करण्याची तारीख २६ एप्रिल सकाळी ११ वाजेपासून सुरू होईल. नामनिर्देशन मागे घेण्याची अंतिम तारीख २९ एप्रिल सायंकाळी तीन वाजेपर्यंत असणार आहे. नामनिर्देशन अर्जात नमूद केलेल्या पक्षानुसार चिन्ह वाटप केले जाईल त्यासह जे उमेदवार अपक्षरीत्या उभे होतील त्यांनाही स्वतंत्र चिन्ह दिले जाईल. उमेदवार त्यांचे नामनिर्देशन हे निवडणूक आयोगाच्या सुविधा वेब पोर्टल दिलेले आहे याद्वारे देखील ऑनलाइन पद्धतीने नामनिर्देशन पत्र दाखल केल्यावर त्याची एक प्रत जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्ष देण्यात यावी, असेही यावेळी सांगितले. यापूर्वी बँकेच्या प्रतिनिधी सोबत झालेल्या बैठकीत निवडणुकीसाठी उभे असलेले उमेदवारांना नवीन बँक खाते उघडाण्याबाबत निर्देश देण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. हे बँक खाते नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या दोन दिवसाआधी उघडावे लागते. प्रत्येक उमेदवाराला ९५ लाख रुपये खर्चाची मर्यादा असून होणारा सर्व खर्च या नवीन उघडलेल्या बँक खात्यात दाखवावे लागतात. नामनिर्देशन पत्रात जोडलेले छायाचित्र हे तीन महिन्यापेक्षा जुने नसावे अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. उमेदवारावर काही गुन्हे असल्यास त्याची माहिती वर्तमानपत्राद्वारे देण्यात यावी व त्याची प्रत ही जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे द्यावी अशी ही माहिती त्यांनी यावेळी दिली. अपक्ष उमेदवारासाठी १० सूचक हवे असतात ज्यांची उमेदवारी ही त्याच मतदारसंघातली असावी. राजकीय पक्षांनी उभे केलेले उमेदवार यांचे खर्च चा ताळमेळ ठेवण्यासाठी इलेक्शन एजंट आणि एक्सपेंडिचर एजंट असे नेमावे आणि वेळोवेळी झालेला खर्च हा निवडणूक आयोगाकडून मिळालेल्या नोंदवहीत नोंदवण्यात यावा याबाबतची प्रशिक्षण देण्यात येणार आहे. जेणेकरून त्या त्यावेळी झालेला खर्च हा त्या त्या खात्यात देण्यात येईल अशी ही माहिती यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली.

मुद्रित, इलेक्ट्रॉनिक समाज माध्यमांसाठी उमेदवारांनी दिलेल्या जाहिराती या माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडून प्रमाणित करून प्रसारित करणे गरजेचे आहे. उमेदवारांनी त्यांचे सामाजिक माध्यमे जसे फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर अन्य काही असल्यास त्याची माहिती नामनिर्देशन पत्रात द्यावी व्यक्तिगत रीत्या स्वतःचा प्रचार करण्यास उमेदवारांना मुभा असून त्यांच्यावतीने इतरांनी प्रचार केल्यास त्याचा खर्च हा उमेदवाराच्या खर्चात जमा करण्यात येईल. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७ अन्वे स्टार प्रचारक म्हणून ओळखले जाणारे राजकीय पक्षाच्या लोकप्रिय नेत्यावर झालेल्या खर्चाची संबंधित कायद्याची तरतूद करण्यात आलेली आहे .त्याप्रमाणे कारवाई केली जाईल याची दक्षता राजकीय पक्षांनी घ्यावी, असे यावेळी सांगितले. एकूण बीड जिल्ह्यासाठी घेण्यात येणाऱ्या परवानग्या या सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी बीड यांच्याकडून मिळतील, तर त्या त्या विधानसभा मतदारसंघातील परवानगी या त्या विधानसभा मतदारसंघातील सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी यांच्याकडून दिल्या जातील अशी ही माहिती यावेळी देण्यात आली. बीड जिल्ह्यातील नामनिर्देशन पत्र संदर्भातली कारवाई निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे करतील तर टपाली मतदाना संदर्भातली कारवाई उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी हे करतील अशी ही माहिती यावेळी देण्यात आली.

# बजरंग सोनवणेंनी रुग्णालयात जाऊन अमोल खुणेंची भेट घेतली

## हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्याची मागणी

वादळवार्ता/गेवराई


मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी अमोल खुणे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्यानंतर मंगळवारी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी गेवराईच्या रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली. हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्याची मागणी ही सोनवणे यांनी केली आहे.

मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी व कोपर्डी बलात्कार प्रकरणातील आरोपींना न्यायालयाच्या आवारात चोप देणारे अमोल खुणे यांच्यावर सोमवारी (दि.१५) रात्री ७.३० वाजेच्या सुमारास अज्ञात तीन ते चार इसमांनी दगडफेक करीत भ्याड हल्ला केला. त्यानंतर हल्लेखोर पसार झाले. त्यांच्यावर गेवराईच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असताना मंगळवारी महाविकास उमेदवार बजरंग सोनवणे यांनी अमोल खुणे यांची रुग्णालयात जाऊन भेट घेत तब्येतीची विचारपूस केली. तर उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी भेटून उपचार व त्यांच्या प्रकृती विषयी माहिती जाणून घेतली. या हल्ल्याचा निषेध करीत या प्रकरणाची चौकशी करून हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी ही बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

यावेळी त्यांच्या सोबत पूजा मोरे, बालासाहेब जाधव, मुकुंद कणसे, कपिल मस्के, नवनाथ अंबाड यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्ष पदी देवराज कोळे यांची निवड



वादळवार्ता/गेवराई

राज्यासह राष्ट्रीय पातळीवर पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे व त्यांच्या न्याय हक्कासाठी लढत असलेल्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाची गेवराई तालुकाध्यक्ष पदाची घोषणा जाहीर करण्यात आली.

दिनांक १५ एप्रिल रोजी राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या नवीन २०२४ च्या गेवराई तालुकाध्यक्ष पदाची घोषणा जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी जाहीर केली. राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी,राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढांगळे, राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य अध्यक्ष संतोष जाधव ,राज्यसचिव निलेश ठाकरे,मराठवाडा अध्यक्ष शंकरसिंह ठाकूर,उपाध्यक्ष मुबशिर खतिब यांच्या आदेशानुसार गेवराई तालुकाध्यक्ष पदी महाराष्ट्र सुपरफास्ट न्यूजचे बीड जिल्हा प्रतिनिधी देवराज कोळे यांची निवड जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी जाहीर केली.

देवराज कोळे यांची निवडीचे मित्रपरिवार व पत्रकार बांधवांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# संदिप चौंडे यांना मातृशोक श्रीमती रमाबाई रविंद्रअप्पा चौंडे यांचे निधन



**वादळवार्ता/परळी वैजनाथ**

संदिप चौंडे व सुरज चौंडे यांच्या मातोश्री श्रीमती रमाबाई रविंद्रअप्पा चौंडे यांचे अल्पशा आजाराने मंगळवार दि.१६ एप्रिल रोजी दुःखद निधन झाले आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ५७ वर्ष होते.

शहरातील अंबेवेस भागातील श्रीमती रमाबाई रविंद्रअप्पा चौंडे यांचे मंगळवार दि. १६ एप्रिल २०२४ रोजी ११.३० वा.अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. संदिप चौंडे व सुरज चौंडे यांच्या मातोश्री होत. वीरशैव समाजाच्या विविध सामाजिक, धार्मिक कार्यात त्यांचा सक्रीय सहभाग असायचा. अत्यंत मनमिळावू स्वभावामुळे त्या सुपरिचित होत्या. त्यांच्या पार्थिवावर मंगळवार दि.१६ एप्रिल रोजी ५ वाजता वीरशैव स्मशानभुमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात २ मुले १ मुलगी , सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# महाविकास आघाडीचे लोकसभेचे उमेदवार निवडून आणण्यासाठी काँग्रेसचे प्रत्येक पदाधिकारी कार्यकर्ता काम करणार

## महेंद्र घरत यांचे पत्रकार परिषदेत आश्वासन

**उरण/विठ्ठल ममताबादे**

देशात व महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाची खूप मोठी ताकद आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीत काँग्रेस पक्ष सहभागी असून महाविकास आघाडीच्या लोकसभेच्या उमेदवारासाठी काँग्रेस प्रत्यक्ष प्रचारात उतरला आहे. महाविकास आघाडीचे लोकसभेचे उमेदवार निवडून येण्यासाठी महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी कार्यकर्ते कामाला लागले असून मावळ लोकसभा मतदार संघातील काँग्रेस, शिवसेना (उबाटा गट ), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट )व समविचारी मित्र पक्ष असलेल्या महाविकास आघाडीचे लोकसभेचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारात काँग्रेस पक्ष प्रत्यक्ष सहभागी असून संजोग वाघेरे यांना काँग्रेसतर्फे जाहीर पाठींबा आहे. संजोग वाघेरे यांना बहुमताने निवडून आणण्यासाठी काँग्रेसचा प्रत्येक पदाधिकारी कार्यकर्ता कामाला लागला असून संजोग वाघेरे यांना बहुमताने निवडून आणण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने कामाला लागा. संजोग वाघेरे लोकसभेच्या निवडणुकीत बहुमताने निवडून येतील असे प्रतिपादन महेंद्र घरत यांनी शेलघर येथे केले.

सध्या लोकसभा निवडणुकीचे वारे सर्वत्र जोरात वाहत आहेत. उन्हाळा असल्यामुळे वातावरण तापत चालले आहे. आता निवडणूक असल्यामुळे राजकीय वातावरणही दिवसेंदिवस तापत चालले आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक खोट्या बातम्या, अफ़वा, खोटा अपप्रचार अनेक ठिकाणी पसरविले जात आहेत. त्यामुळे या अफ़वा दूर करण्यासाठी व भविष्यात महाविकास आघाडीच्या उमेदवाराला निवडणुकीत कोणत्याही प्रकारे फटका बसू नये, लोकसभा उमेदवाराचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये या अनुषंगाने रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे मंगळवार दि १६ एप्रिल २०२४ रोजी समाज मंदिर हॉल, शेलघर, तालुका उरण येथे सकाळी ११ वाजता बैठक व पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कामगार नेते,काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत बोलत होते. या प्रसंगी व्यासपिठावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, मच्छिमार नेते मार्तंड नाखवा, रायगड जिल्हा उपाध्यक्ष किरीट पाटील,अल्पसंख्यांक विभागाचे अखलाक शिलोत्री, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ.मनिष पाटील, जिल्हा सरचिटणीस रामनाथ पंडित,रायगड जिल्हा युवक अध्यक्ष निखिल ढवळे,रायगड जिल्हा पर्यावरण सेल जिल्हाध्यक्ष राजीव पाटील,रायगड जिल्हा महिला अध्यक्ष ॲड. श्रद्धा ठाकूर,महिला तालुका अध्यक्ष रेखा घरत, उपाध्यक्ष निर्मला पाटील, उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे,पनवेल तालुका अध्यक्ष नंदराज मुंगाजी,खालापूर तालुका अध्यक्ष कृष्णा पारांगे,खोपोली शहराध्यक्ष रिचर्ड जॉन,कर्जत तालुकाध्यक्ष संजय गवळी,पेण तालुका अध्यक्ष अशोक मोकल,रोहा तालुका अध्यक्ष सुनील देशमुख,महाड तालुका अध्यक्ष अफजल चांदले,नागोठणे शहराध्यक्ष अशपाक पानसरे,सुधागड पाली तालुका अध्यक्ष बाबा कुलकर्णी आदी पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना महेंद्र घरत म्हणाले की भिवंडी लोकसभा काँग्रेस पक्षाला सोडण्यात यावी यासाठी मी तसेच काँग्रेस पक्ष आग्रही होते. मात्र ती जागा दुसऱ्याला गेली. लोकसभेला मावळ मतदार संघात शिवसेना उबाटा गटाचे उमेदवार निवडणुकीत उभे आहेत. काँग्रेसला आशा होती की कोकणात लोकसभेसाठी काँग्रेस पक्षाला उमेदवारी मिळेल पण तसे झाले नाही. तरी विधानसभेला आम्हाला सन्मान जनक जागा मिळतील अशी अपेक्षा करतो. मशाल आणि तुतारी हे नवीन चिन्ह आहेत. मात्र काँग्रेसचे चिन्ह हात हे सर्वांत जुने चिन्ह आहे. त्यामुळे ते लोकांच्या कायमचे लक्षात आहे. असे असले तरी युवा नेते राहुल गांधी यांचे हात बळकट करण्यासाठी महाविकास आघाडीचे सर्वच उमेदवार निवडून येण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. इंडिया आघाडी जिंकायला पाहिजे असे महाविकास आघाडीचे तसेच सर्वसामान्य जनतेचे मत आहे. आज मोदी विरोधात प्रचंड संताप आहे. या मोदी विरोधी लाटेचा फायदा महाविकास आघाडीच्या प्रत्येक पदाधिकारी कार्यकर्त्यांनी घेतला पाहिजे.माजी खासदार तथा महायुतीचे लोकसभेचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी मावळ लोकसभा मतदार संघात कोणतेही कामे केली नाहीत. जनतेशी संपर्क ठेवला नाही. त्यामुळे त्यांचा पराभव निश्चित आहे. मोदी विरोधी लाट असल्यामुळे संजोग वाघेरे निवडून येतील. देश वाचला पाहिजे, संविधान टिकला पाहिजे अशी नेते राहुल गांधी यांची इच्छा आहे त्यामुळे संजोग पाटील यांना बहुमताने निवडून आणण्यासाठी सर्वांनी जोमाने कामाला लागा असे आवाहन महेंद्र घरत यांनी पत्रकार परिषदेत केली.या पत्रकार परिषद मुळे जनतेच्या मनातील भ्रम दूर झाला असून काँग्रेस सारख्या महाबलाढ्य पक्षाचा संजोग वाघेरे यांना पाठिंबा मिळाल्याने संजोग वाघेरे यांचा विजय निश्चित मानला जात आहे.




दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रक ग्ु राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )